राज्यातील विद्यार्थ्यांसाठी अपघात विमा (राजीव गांधी विद्यार्थी सुरक्षा) योजना सन २००९-२०१०

**महाराष्ट्र शासन**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांक: पीआरई २००८/(प्र.क्र.३८०/२००८)/प्राशि-१

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२

दिनांक २८ जूलै, २००९

**वाचावे :-**

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र. पीआरई २००१/५७७८३/२८९१/प्राशि-१, दिनांक २० ऑगस्ट, २००३

२) शासन परिपत्रक क्र. पीआरई २००१/५७७८३/२८९१/प्राशि-१, दिनांक १ ऑक्टोबर २००३.

३) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र. पीआरई २००४/५७७८३/२८९१/प्राशि-१, दिनांक १७ ऑगस्ट २००४.

४) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.पीआरई २००५/४२८४/प्राशि-१, दिनांक १९ ऑगस्ट २००५.

५) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.पीआरई २००६/४९३०/प्राशि-१, दिनांक १९ ऑगस्ट २००६.

६) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.पीआरई २००७/६२३/प्राशि-१, दिनांक ९ ऑगस्ट २००७.

७) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.पीआरई २००७/६२३/प्राशि-१, दिनांक २४ ऑगस्ट २००७ व २६ ऑक्टोबर २००७.

८) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.पीआरई २००७/(८२०/०७)/प्राशि-१, दिनांक १० जून २००८

९) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.पीआरई २००८/(प्र.क्र.३८०/०८)/प्राशि-१, दिनांक २५ऑगस्ट, २००८

१०) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्र.प्राशिसं/२००९-१०/रागांवियो/ड-५१६/२५४९, दि.२५जून, २००९

**प्रस्तावना :-** राज्यातील इयत्ता १ ली पासून उच्च शिक्षण घेणा-या सर्व विद्यार्थ्यांना वैयक्तिक अपघात विमा लागू करण्याची योजना संदर्भाधीन क्र.१ येथील दि.२० ऑगस्ट २००३ च्या शासन निर्णयान्वये सुरु करण्यात आली आहे. सदर विमा योजना शालेय शिक्षण विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, आदिवासी विकास विभाग, कृषी व पशुसंवर्धन विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग, सामाजिक व सांस्कृतिक विभाग इत्यादी प्रशासकीय विभागांच्या अखत्यारितील सर्व मान्यताप्राप्त शाळा, विद्यालये/महाविद्यालयातील व शैक्षणिक संस्थांमधील सर्व विद्यार्थ्यांना लागू करण्यात आलेली आहे.

२ या योजनेमध्ये एखाद्या विद्यार्थ्यास अपघात झाल्यास, तो कोणत्या स्वरुपाचा आहे त्यासाठी विमा कंपनीकडून मिळणारी विम्याची रक्कम, विमा लागू न होणा-या बाबी, आर्थिक तरतूद इत्यादीचा तपशिल शासन निर्णय, दि.२० ऑगस्ट, २००३ मध्ये नमूद केलेला आहे. तसेच, अपघाताचा दावा सादर करण्यासाठी अंवलंबवायची कार्यपद्धती शासन परिपत्रक दि.१ ऑक्टोबर, २००३ मध्ये विशद केली आहे. संदर्भाधीन शासन निर्णयाद्वारे योजनेकरिता वेळोवेळी विमा कंपन्यांना विम्याचा हप्ता अदा करण्यात आलेला आहे.

३. राज्यातील विद्यार्थ्यांना अपघात योजना (राजीव गांधी विद्यार्थी सुरक्षा) सन २००८-२००९ या वर्षापासून या योजनेंतर्गत योग्य विमा कंपनीची निवड करणे, शासनाच्यावतीने विमा कंपनीशी करार करणे, योजनेची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असलेली संपूर्ण कार्यवाही करण्याचे अधिकार शासन निर्णय संदर्भ क्र. ८, दिनांक १०/६/२००८ अन्वये शिक्षण संचालक (प्राथमिक) यांच्यावर सोपविली आहे.

४. त्यानुसार सन २००९-१० या वर्षाकरिता शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी निविदा प्रक्रिया अवलंबून विमा कंपनीची शिफारस केलेली आहे. त्याअनुषंगाने निवड केलेल्या कंपनीस विमा हप्ता अदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**<u>शासन निर्णय:-</u>** राज्यातील इयत्ता १ ली ते उच्च शिक्षण घेणा-या सर्व विद्यार्थ्यांना दिनांक २७ ऑगस्ट २००९ ते २६ ऑगस्ट, २००१० या कालावधीसाठी राजीव गांधी विद्यार्थी सुरक्षा योजना **नॅशनल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, मंडल कार्यालय, xiv स्टर्लिंग सिनेमा बिल्डिंग, दुसरा माळा, ६५ मर्झबान मार्ग, मुंबई-४०० ००१** या कंपनीस कार्यान्वित करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. या योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना / पालकांना मिळणा-या भरपाईची रक्कम शासन निर्णय क्र.पीआरई- २००१/५७७८३/२८९१/प्राशि-१, दिनांक २० ऑगस्ट, २००३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे राहील. या विमा योजनेसाठी युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लिमिटेड वर नमूद केलेल्या कालावधीसाठी प्रति

विद्यार्थी वार्षिक विमा हप्ता रु.०.५९ (अक्षरी एकोणसाठ पैसे फक्त) दराने केंद्रशासनाच्या सर्व सेवा करांसह राहील.

२. सन २००९-२०१० या वर्षातील वर नमूद केलेल्या कालावधीसाठी रु. ०.५९ सर्व सेवा करांसह या दराने एकुण २,४२,००,००० विद्यार्थ्यांचा विमा उतरविण्यासाठी विम्याचा प्रति विद्यार्थी वार्षिक विमा हप्ता (Premium) व त्यावरील सेवा करासह एकूण रु.१,४२,७८,०००/- (रुपये एक कोटी बेचाळीस लाख अठ्यात्तर हजार फक्त) इतकी रक्कम अर्थसंकल्पित रुपये २,८५,००,०००/- मधून मंजूर करण्यात येत आहे.

३. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना ही रक्कम उक्त विमा कंपनीस अदा करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे. तसेच, या रक्कमेचे देयक जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे यांना सादर करुन रक्कम धनादेशाद्वारे **नॅशनल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड** मुंबई या कंपनीस अदा करावी.

४. सदर खर्च "२२०२- सर्वसाधारण शिक्षण-८० सर्वसाधारण, ८०० इतर खर्च, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०६) (०२) - राज्यातील विद्यार्थ्यांसाठी अपघात विमा योजना (२२०२ ३१०९) ३१-सहाय्यक अनुदाने, मागणी क्र. ई-२" या लेखाशिर्षाखाली २००९-२०१० या वर्षाकरिता उपलब्ध असलेल्या तरतूदीतून खर्ची टाकण्यात यावा.

हा शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा सांकेतांक क्र. **२००९०७ २८१४०६०६००१** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**( झं. सा. रणदिवे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

मा. मुख्यमंत्री यांचे सचिव
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग / सचिव, आदिवासी विकास विभाग / सचिव, कृषी विभाग / सचिव, सामाजिक न्याय व सांस्कृतिक कार्य विभाग / सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग / सचिव, पशुसंवर्धन विभाग / सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
शिक्षण संचालक (प्राथमिक शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे

संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२,मुंबई/नागपूर
महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२,मुंबई/नागपूर
आयुक्त, आदिवासी विकास, आदिवासी विकास भवन, आग्रा रोड, नाशिक
आयुक्त, कृषी, कृषी संचालनालय, सेंट्रल बिल्डींग, ३ रा मजला, पुणे
संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय / संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय / संचालक, (प्रशिक्षण), आय.टी.आय., व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, ३, महापालिका मार्ग,मुंबई ४०० ००१
संचालक, कला संचालनालय, कलाशाळा आवार, दादाभाई नौरोजी मार्ग, मुंबई ४००००१
संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, सेंट्रल बिल्डींग, पुणे
संचालक, समाजकल्याण / आयुक्त, अपंग कल्याण/ संचालक, वि.जा.भ.ज.,वि.मा.प्र. व इ.मा.व.संचालनालय, ३ चर्च, पुणे - १
संचालक,वैद्यकीय शिक्षण व संशोधन, ४ था मजला, सेंट जॉर्ज हॉस्पिटल कंपाऊंड, मुंबई
सर्व जिल्हाधिकारी/ सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
सर्व शिक्षण निरीक्षक (दक्षिण / उत्तर / पश्चिम), मुंबई
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद
सर्व शिक्षणाधिकारी, नगरपरिषदा / नगरपालिका / महानगरपालिका
जनरल मॅनेजर,**नॅशनल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, मंडल कार्यालय, xiv स्टर्लिंग सिनेमा बिल्डिंग, दुसरा माळा, ६५ मर्झबान मार्ग, मुंबई-४०० ००१**
कार्यासन, (अर्थसंकल्प), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई (प्रसिद्धीसाठी).
निवड नस्ती, कार्यासन, (प्राशि-१), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई

---